# जाब

पावसा रे पावसा....
असा कसा रे तू आगांतुकासारखा
कोसळतोस तू "इथे"?.......
तुझी खरी वाट तर पहाताहेत ना
सर्वच जण "तिथे"!.........

पावसा तू आलास...
की, करतोस हिरवं रान, नी
छान, गारगार ........."इथे"!
पण इतरत्र लपतांना ...
तुला आहे का रे, भान?
कुणी होरपळतयं ,......."तिथे"!

पावसा रे पावसा......
उन्हाशी खेळतांना,
इंद्रधनुची उधळण,
करतोस मग तू ........"इथे"!
निष्पर्ण वृक्षाखाली,
सावली शोधणारी,
तगमग, तुला दिसेना ...."तिथे"!

बरसतांना, का रे तुझा,
भेदभाव असा?
झुकते माप असते ........"इथे"!
तुझी प्रार्थना करुन सुध्दा,
कां रे पावसा?
खडखडाट असतो........ "तिथे"?

मनापासून विचारतेय......

पावसा एकदाच सांग रे,
कानांत माझ्या ......"इथे"!
पाण्यासाठी होणारे, हे हाल
आणि लागणारी रांग...
थांबणार तरी कधी....... "तिथे"?

**........चित्रा मेहेंदळे**